गोवादूत : पणजी – शुक्रवार, ७ ऑगस्ट २०१५

# ग्रामीण विकासासाठी शिक्षणाची नितांत गरज

## ➲ मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देशमुख यांचे प्रतिपादन

**दोडामार्ग, दि. ६ (प्रतिनिधी)**

शहरात राहून निसर्गाशी नाळ जोडता येत नाही, ती जोडण्यासाठी खेड्यातच राहावे लागते. ग्रामीण भागातील विकास करण्यासाठी शिक्षणाची अत्यंत गरज आहे. हीच गरज ओळखून ग्रामीण भागात शिक्षण संस्थाचालक व शिक्षक खूप कष्टाने हे काम करत आहेत, असे विचार मुंबई विद्यापीठाचे नवनिर्वाचित कुलगुरू डॉ. संजय देशमुख यांनी व्यक्त केले.

येथील लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयाच्या १५ व्या वर्धापनदिनानिमित्त प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते.

आईवडिलांच्या उपकाराची जाणीव ठेवा. आपण शिक्षण घेऊन कितीही मोठे झालो तरी गुरुजनांना विसरू नका. जगात प्रत्येकजण गुरू आहे. आपले मित्र आपणास छोट्या छोट्या गोष्टींमधून शिक्षण देत असतात. अशा गुरूंना ओळखता आले पाहिजे. आपण कितीही मोठे झालो तरी आपल्यापेक्षा जगात दुसरा कोणीतरी मोठा व्यक्ती आहे, याची जाण असावी, असे देशमुख म्हणाले.

यावेळी त्यांनी आपल्या बालपणातील अनुभव विद्यार्थ्यांना सांगून त्यांना प्रेरणा दिली. विद्यार्थ्यांनी हितगूज करताना पदव्युत्तर शिक्षण घेण्यासाठी आर्थिक मदत करण्याचे आश्वासन त्यांनी दिले. कुलगुरूंच्या हस्ते इन्फोकॉम, अमृतवेल, हॉरायझन, नवदर्पण अर्ध वार्षिक वृत्तपत्र, जीवन जगत हा प्रा. प्रशांत ढेपे यांच्या हिंदी कविता संग्रहाचे प्रकाशन व महाविद्यालयाच्या महिला विकास कक्षामार्फत होतकरू व गरजू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष व संस्थेचे कार्याध्यक्ष अभिजित हेगशेट्ये यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांनी प्रास्तांविक केले. कुलगुरू यांचा सत्कार हेगशेट्ये यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी संस्थेचे स्थानिक समितीचे सभासद भाई परमेकर, विवेकानंद नाईक, बाबूराव धुरी, सूचन कोरगावकर तसेच शिक्षणप्रेमी, ग्रामस्थ, पत्रकार, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. सोपान जाधव यांनी सूत्रसंचालन केले. श्रीपाद पाडगावकर यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. दिलीप बर्वे यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांचे योगदान लाभले.